**प्रेस नोट**

दिनांकः- २७/०८/२०१९

बंडगार्डन पोलीस स्टेशन, पुणे शहर

---

**बसमधील गर्दीचा फायदा घेऊन प्रवाशांना लुटणाऱ्या टोळीच्या बंडगार्डन पोलीसांनी आवळल्या मुसक्या.**

बंडगार्डन पोलीस स्टेशनच्या हद्दीतील पुणे स्टेशन हे मध्यवर्ती ठिकाण असून त्या परिसरात वेगवेगळ्या ठिकाणाहून प्रवासी ये-जा करीत असतात. प्रवासी त्यांच्या इच्छित स्थळी पोचण्याकरीता बसचा वापर करतात. त्यामुळे बसमध्ये मोठ्या प्रमाणावर गर्दी असते. अशा गर्दीचा फायदा घेऊन प्रवाशांचे मोबाईल फोन चोरणारी टोळी बंडगार्डन पोलीसांनी पकडली असून त्यांच्याकडून १,३३,५००/- रु. किंमतीचे १८ स्मार्टफोन हस्तगत केले आहेत.

सदर बाबत सविस्तर माहिती अशी की, दि.२६/०८/२०१९ रोजी बंडगार्डन पोलीस स्टेशन तपास पथकाचे अधिकारी व कर्मचारी पुणे स्टेशन परिसरात गुन्ह्यांना आळा बसविण्याकरीता पायी पेट्रोलींग करीत असताना तपास पथकास बातमी मिळाली की, पुणे स्टेशन परिसरात काही दिवसांपासून तीन इसम एकत्र फिरत असून ते पीएमटी बसमध्ये प्रवासी चढत असताना किंवा उतरत असताना त्यांचे आजूबाजूला गर्दी करुन लोकांच्या खिशातील मोबाईल, पाकीट अथवा पैसे लुटतात. त्यांची टोळी असून ते सर्वजण पुणे स्टेशन परिसरात फिरत आहेत. अशी बातमी मिळाल्याने स्टाफसह सदर ठिकाणी छापा घातला असता इसम नामे- १) विठ्ठल भागवत मिसाळ, रा. बीड, सध्या भेकराई नगर जकात नाक्याजवळ, हडपसर, पुणे, २) अनिल अरुण बोबडे, रा. उल्हासनगर, कल्याण, सध्या कॅम्प, पुणे व ३) सुरेश बाबुदास वैष्णव, रा. रायपूर, पाली, राजस्थान, सध्या वडकी नाला, हडपसर, पुणे यांना तिघांना ताब्यात घेऊन त्यांचेकडून १,३३,५००/- रु. किंमतीचे एकूण १८ स्मार्टफोन हस्तगत केले आहेत. मिळून आलेल्या मोबाईल बाबत त्यांचेकडे चौकशी केली असता त्यांनी सदरचे मोबाईल फोन बसमधून चोरी केल्याचे सांगितले.

सदरची कारवाई परिमंडळ-२ चे पोलीस उप-आयुक्त श्री. शिरीष सरदेशपांडे, लष्कर विभागाचे सहा.पोलीस आयुक्त श्री. रविंद्र रसाळ, बंडगार्डन पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. सुनिल तांबे, व पोलीस निरीक्षक, गुन्हे श्री. दिगंबर शिंदे यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे सहा.पोलीस निरीक्षक श्री. संदिप जमदाडे, श्रीधर सानप, सचिन कदम, संतोष पागार, हरीष मोरे, अय्याज दड्डीकर, कैलास डुकरे, निखील जाधव, किरण तळेकर, सागर जगताप, गौरव उभे यांनी केली.